# प्रेसनोट

जा.क्र. २११ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:— २३/०४/२०१८

## ''२९वा राज्य रस्ता सुरक्षा सप्ताह तथा महाराष्ट्र राज्य रस्ता सुरक्षा अभियान दिनांक २३ एप्रिल ते ०७ मे २०१८ ''

**भंडारा** :— आज दिनांक २३/०४/२०१८ रोजी पोलीस मुख्यालय बहुद्देशीय सभागृह, भंडारा येथे २९ वा राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह तथा महाराष्ट्र राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०१८ उपप्रादेशिक परिवहन कार्यालय व पोलीस विभाग भंडारा यांचे संयुक्त विद्यमाने दि. २३/०४/२०१८ ते दि. ०७/०४/२०१८ या कालावधीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलन करुन करण्यात आली. कार्यक्रमाला उपस्थित असलेले भंडारा जिल्हयाचे प्रमुख अतिथी मा. विनीता साहू, पोलीस अधीक्षक भंडारा, रश्मी नांदेडकर अपर पोलीस अधीक्षक भंडारा, कुलकर्णी पोलीस उपअधिक्षक (गृह) भंडारा, राजेन्द्र वर्मा उपप्रादेशीक अधीकारी भंडारा, रोहीनी बसावे सहाय्यक अभियंता बांधकाम विभाग, प्रशांत चिंचोळकर प्रादेशिक परिवहन अधीकारी, प्रमोद सरोदे मोटार वाहन निरीक्षक, दत्ता मेश्राम जिल्हा चालक व मालक संघटनेचा अध्यक्ष, धुर्वे, अमित काळे परिवहन विभागाचे निरीक्षक, रवि गिते जिल्हा माहिती अधीकारी, सपोनि. पोटे, प्रभारी वाहतुक शाखा भंडारा, वर्मा राखीव पोलीस निरीक्षक, प्रधान पोलीस उपनिरीक्षक, पोलीस युनीट रुग्णालयाचे डॉ. डब्लु. डी. कोचे, एच. जी. चारमोडे, उदाराम उके हे कार्यक्रमाला उपस्थीत होते.

कार्यक्रमामध्ये उपप्रादेशिक परिवहन अधीकारी राजेंद्र वर्मा यांनी आपल्या भाषणात सांगीतले की, रस्ता सुरक्षा ही आपल्या करीता अतीशय महत्वाची बाब आहे. जास्तीत जास्त अपघात रोड अपघातात होतात. म्हणुन रस्ता सुरक्षा सप्ताह दरम्यान आपण लोकात रस्ता सुरक्षा नियमांची जाणीव करुन देतो. रोड नियम, वाहतुकीचे नियम पाळल्यास अपघात होणार नाही. लोकांनी स्वयंम शिस्त बाळगावी. तसेच वाहतुकीच्या नियमाचे पालन करावे.

यावेळी पोलीस अधीक्षक मा. विनीता साहू यांनी ''रस्त्याने वाहन चालवितांना वाहतुकीचे नियमाचे पालन करुन काळजीपुर्वक व सुरक्षीतपणे वाहन चालविण्याबाबत मार्गदर्शन केले''. वाहतुकीचे नियम पाळल्यास अपघाताचे प्रमाण कमी होवू शकते. लहान मुले ट्रिपल सिट वाहन चालवितात, त्यांचे कडे लायसन्स नसते. त्यामुळे अपघात होवु शकतो, पालकांनी १८ वर्ष झाल्यानंतर त्यांना वाहन चालविण्याची परवानगी दयावी. तसेच वाहन चालवितांना अचुक पध्दतीने वाहन चालविल्याने, तसेच मोबाईल वर बोलतांना वाहन चालवितात. त्यामुळे

त्याचे लक्ष वाहनाकडे नसुन बोलण्याकडे असतो, त्यामुळे अपघात होण्याची शक्यता उद्‌भवते. वाहन चालवितांना आपल्या सुरक्षेकरीता सर्व लोकांनी हेल्मेंटचा वापर करावा.

यावेळी अपर पोलीस अधीक्षक रश्मि नांदेडकर यांनी जिल्हयात अपघात गुन्हयाचे प्रमाण जास्त दिसुन येत आहे. अपघाताच्या गुन्हयांची संख्या कमी करणे, ही आपली जबाबदारी आहे. रस्त्यावरील सुरक्षा आपण सर्वांनी राखली पाहीजे. ड्रन्क ॲन्ड ड्राईव्ह गुन्हयाचे प्रमाण कमी व्हावे, याकारीता दारु पिवुन वाहन चालविणाऱ्यांवर कारवाई करावी.

सदर उद्‌घाटन कार्यक्रमा दरम्यान आदेश्वर सुझुकी भंडारा, इरोज हुन्डाई भंडारा, कटकवार ड्रायव्हींग स्कुल साकोली, साईराज ऑटोमोबाईल भंडारा, ए. के. गांधी टि. व्ही. एस मोटर्स भंडारा ई. बॅनर व्दारे लोकांना माहिति देण्यात आली. त्याचप्रमाणे रक्तदान शिबीराचे उद्‌घाटन मा. विनीता साहू यांच्या हस्ते करण्यात आले. रक्तदान शिबीरात १३ व्यक्तींनी रक्तदान केले. कार्यक्रमाचे संचालन स्मिता गालफाडे व मुकंदा ठवकर यांनी केले.

श्री. सुनील कुलकर्णी पोलीस उपअधिक्षक (गृह) यांनी त्याच्या भाषणात गतवर्षी ४६५ अपघात होऊन त्या अपघातात ६७३ व्यक्ती मरण पावल्या.अपघातात मृत्यु होण्याचे व अपघात हे व्यस्त प्रमाण असुन सर्वांना वरील प्रमाणे यावर्षी अपघाताचे कमी करण्याकरीता सक्रिय पणे भाग घेवून आवश्यक उपाययोजना करुन सुरक्षीततेचे सर्व वाहतुक नियमांचे पालन करण्याचा संकल्प करण्याची गरज असल्याचे सांगुन वाहतुक नियम काटेकोरपणे पाळण्याचे आवाहन सर्वांना केले, त्यानंतर आभारप्रदर्शन करुन कार्यक्रमाची सांगता झाली.

**(एस. व्ही. कुलकर्णी )**
**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ०७१८४२५४७०१**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.